ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# भारतीय शेतमजूर : एक अभ्यास

**प्रा. डॉ. सुरेश बन्सपाल**
समर्थ महाविद्यालय, लाखनी जि.भंडारा (म.रा.)

**गोषवारा** – भारतातील ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. बहुसंख्य लोक षेतीवर अवलंबून असतात. परंतु सर्वाकडे शेती करीता जमीन उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे अनेकांजवळ असणारी जमीन ही त्यांना पुरेसे जीवनमान प्राप्त करुन देत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांना शेतमजूर म्हणून काम करण्याशिवाय पर्याय नसतो. शेतमजूरांचे विविध गट पडतात. जसे भूमिहीन शेतमजूर जे कोणत्याही एका विशिष्ट जमीनदाराशी बांधलेले नसतात. परंतू ते इतरांकरीता आपले श्रम देत असतात. स्वतःची जमीन असणारे परंतू त्यामधून पुरेसे उत्पन्न प्राप्त होत नसल्याने इतरांच्या जमिनीवर काम करणारे, स्वतःजवळ जमीन असणारे परंतु कुटुंबातील सदस्यसंख्या जास्त असल्याने इतरांच्या शेतावर काम करावे लागणारे शेतमजूर असतात. यापैकी भूमिहीन शेतकरी अत्यंत हालाखीचे जीवन जगत आहेत. ग्रामीण भागातील बेकारी कमी करण्याकरिता सरकारने अनेक योजना राबविल्या आहेत. जसे कामाच्या बदली धान्य योजना, महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, इत्यादी या योजनांद्वारे ग्रामीण भागातील दारिद्रय रेशेखाली जीवन जगणाऱ्या शेतमजूरांना मोठया प्रमाणावर लाभ झालेला आहे.

**प्रस्तावना** :– शेती व्यवसाय हा अत्यंत पुरातन असा व्यवसाय आहे. शेती व्यवसायाने मानवाला प्रारंभिक अवस्थेत जीवनमान व स्थैर्य प्राप्त करुन दिले आहे. मानवाची अन्नधान्याची गरज शेती कडूनच पूर्ण करण्यात येते. भारतासारख्या विकसनशील आणि अमेरिका, जपान यासारख्या विकसित देशांतदेखील शेती व्यवसायाला विकासाच्या प्राथमिक अवस्थेत महत्वाचे स्थान होते. जसजशी अर्थव्यवस्था विकसीत होत जाते, तसतसा शेती व्यवसायाचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी होत जातो. भारतीय अर्थव्यवस्था विकसनशील अर्थव्यवस्था असल्याने एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीक्षेत्राचा वाटा अद्यापही मोठा असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात प्रमुख व्यवसाय शेती असला तरी तो सर्व लोकांना रोजगार देऊ शकत नाही. ग्रामीण भागामध्ये जशी अल्पभूधारकांची संख्या सुध्दा मोठी आहे. त्याचप्रमाणे स्वतःजवळ काहीच जमीन नसणारे व स्वतःजवळील जमिनीमधून पुरेसे उत्पादनमान, उत्पन्न प्राप्त होवू न शकणाऱ्या लोकांची संख्या सुध्दा मोठी आहे. अशा लोकांना मात्र दुसऱ्याच्या शेतावर काम करणेच एवढाच पर्याय उपलब्ध असतो. ग्रामीण भागात शेतमजूर म्हणून करणारे व शहरी भागात मजूर, श्रमिक म्हणून काम करणारे हया दोहांमध्ये फरक असल्याचे दिसून येते. शहरी भागामधील मजुरांना व्यवसायाशी संबंधित असणारे ज्ञान, कौषल्य प्राप्त झालेले असते. ग्रामीण भागातील मजूरांना मात्र तशा प्रकारची संधी उपलब्ध होऊ शकत नाही.

**संशोधन पध्दती** :– या शोध निबंधाकरिता प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. भेटी व निरिक्षण नोंदविण्यात आले आहे. टी.व्ही वरील कार्यक्रम, वर्तमानपत्रे यांच्या आधारे शोध निबंध लिहिण्यात आला आहे.

**उद्‌देश** :–

1) शेतमजूर स्वतःची जमीन नसल्यामुळे विशिष्ट जमीनदाराशी बांधील राहतात काय याचा अभ्यास केला आहे.

2) शेतमजूराची जमीन सावकाराने ताब्यात घेतल्यावर शेतकऱ्याला शेतमजूर म्हणून काम करण्याशिवाय पर्याय नसतो याचा अभ्यास केला आहे.

3) शेतीची उत्पादन क्षमतेत वाढ नसल्यामुळे दुसऱ्याच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम करण्याशिवाय पर्याय नसतो याचा अभ्यास केला आहे.

4) लोकसंख्या वाढीमुळे जमिनीचे मोठया प्रमाणावर तुकडीकरण झालेले असल्याने जमिनीच्या लहान तुकडयातून पुरेसे उत्पादन घेणे अवघड बनते. त्यामुळे अधिक उत्पन्न मिळविण्याकरीता शेतमजूर म्हणून काम करतो. याचा अभ्यास केला आहे.

**गृहितके** :–

1) शेतमजूर जमीनदाराशी बांधील असतात.

2) शेतजमिन सावकाराकडे गहान असल्याने शेतमजूर म्हणून काम करतात.

3) शेतीची उत्पादन क्षमता कमी असल्यामुळे दुसऱ्याकडे शेतमजूर म्हणून काम करतात.

4) भाऊ हिश्यामुळे जमिनीचे लहान तुकडे झाल्यामुळे शेतमजूर म्हणून काम करतात.

5) अधिक उत्पन्न मिळविण्याकरीता शेतमजूर म्हणून काम करतात.

**शेतमजूरांचे वर्गीकरण** :– शेतमजूरांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे

1) भूमिहीन शेतमजूर :– ज्या शेतमजूरांकडे त्यांच्या मालकीची जमीन नसते त्यांना भूमिहीन षेतमजूर असे म्हणतात. भूमिहीन

शेतमजूर जे जमिनदाराशी, त्याच्या षेतावर काम करण्याकरीता बांधील असतात.

2) व्यक्तिशः स्वतंत्र भूमिहीन शेतमजूर :– भूमिहीन शेतमजूर जे व्यक्तिशः स्वतंत्र असतात परंतू इतरांकरीता ते आपले श्रम देत असतात. म्हणजेच या वर्गातील शेतमजूर कोणत्याही एका जमीनादारांशी बांधेले नसतात.

3) गरीब शेतमजूर :– ज्याशेतकऱ्याजवळ जमिनीचा लहानसा तुकडा असतो. पण त्यांना त्यामधून पुरेसे उत्पन्न उपलब्ध होत नसल्यामुळे इतर शेतकऱ्याकडे काम करतात.

4) कुटुंब संख्या जास्त असणारे शेतमजूर :– स्वतःजवळ शेती असणारे म्हणजेच आपल्या जवळील जमिनीतून पुरेसे उत्पन्न प्राप्त होऊ शकणारे षेतकरी, परंतु कुटुंबावर अवलंबून राहणाऱ्या सदस्यांची संख्या मोठी असणारे व इतर मोठया षेतकऱ्यांकडे काम करणारे षेतकरी

**शेतमजूरांची सद्यःस्थिती** :– भूमिहीन षेतमजूरांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. दारिद्रयाची आहे. भूमिहीन शेतमजूर गुलामांप्रमाणे आपले जीवन जगत असतात. त्यांना आपली मजूरी पैशाच्या स्वरूपात न मिळता वस्तूंच्या स्वरूपात जसे धान्य, कपडे, राहण्याकरीता षेतावर तात्पुरती जागा इत्यादीच्या स्वरूपाची प्राप्त होते. भूमिहीन षेतमजूर एका विशिष्ठ जमीनदारास किंवा मालकास बांधील असतात. त्यामुळे त्याला सोडून इतर कोणाकडे काम करण्याचे स्वातंत्र्य त्याला नसते. आपल्या मालकास खूष ठेवण्याकरीता काही भेटवस्तू त्यांना मालकास द्याव्या लागतात. ग्रामीण भागातील शेतमजूरांपैकी भूमिहीन शेतमजूरांची स्थिती अत्यंत दयनीय आहे.

**शेतमजूरांची संख्येतील वाढीची कारणे :–**

1) शेतीवर लोकसंख्येचा अधिक भार पडणे, घरातील धार्मिक कार्ये, अनुत्पादक कामे, यासारख्या विविध कार्याकरीता शेतकरी मोठया प्रमाणावर सावकारांकडून कर्जे घेत असतात. अनेकदा हे कर्जे फेडणे शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेरचे असते. कर्ज सहज प्राप्त होत असल्यामुळे कर्ज घेण्याची त्यांची वृती वाढीस लागते. सावकार कर्जावर व्याजसुध्दा जास्त लावतात अशा परिस्थित कर्जफेडणे शक्य होत नाही. तारण म्हणून ठेवण्यात आलेली शेती सावकार आपल्या ताब्यात घेतो. त्यामुळे शेतकऱ्याला शेतमजूर म्हणून काम करण्याषिवाय पर्याय नसतो.

2) शेतीच्या उत्पादन वाढीकरीता मुबलक पाणीव्यवस्था, खते, बी–बियाण्यांचा पुरेशा प्रमाणात पुरवठा, त्याचबरोबर वित्तपुरवठा असणे आवश्यक असते. भारतात या सुविधा पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे उत्पादनात वाढ होणे शक्य नसते. त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्याला षेतमजूर म्हणून काम करण्याशिवाय पर्याय नसतो.

3) कुटुंबातील संख्या वाढत असल्यामुळे जमिनीचे मोठया प्रमाणावर तुकडीकरण झालेले असल्याने, जमिनीच्या लहान तुकडयामध्ुन पुरेसे उत्पादन घेणे अवघड असते. परिणामी घरच्या गरजा भागविण्याकरीता व अधिक उत्पन्न मिळविण्याकरीता शेतकऱ्याला शेतमजूर म्हणून काम करण्या शिवाय दुसरा पर्याय नसतो.

**निष्कर्ष** :– भारतीय शेतमजूरांचा अभ्यास केला असता खालील निष्कर्श आढळून आलेत.

1) भूमिहीन शेतमजूर मालकी जमीन नसल्यामुळे जमीनदारंषी बांधील असतात.

2) घरातील धार्मिक कार्ये, अनुत्पादक कामे यासारख्या विविध कार्याकरीता शेतकरी मोठया प्रमाणावर सावकाराकडून कर्ज घेत असतात. कर्जे फेडू न सकल्यामुळे शेतजमीन सावकाराकडे गहाण ठेवीवी लागते. त्यामुळे शेतकरी षेतमजूर म्हणून काम करतात.

3) पाणीव्यवस्था, खते, बी–बियाणांचा पुरेशा पुरवठा, वित पुरवठा नसल्यामुळे षेतीची उत्पादक्षमता कमी होते. त्यामुळे शेतकऱ्याला दुसऱ्याकडे शेतमजूर म्हणून काम करावे लागते.

4) कुटुंबातील संख्या वाढल्यामुळे भाऊ हिषे होतात. त्यामुळे जमिनीचे लहान–लहान होतात तुकडे त्यामुळे शेतकऱ्याला शेतमजूर म्हणून काम करावे लागते.

5) जमिनीचे लहान तुकडयामुळे घरच्या गरजा भागविण्याकरीता व अधिक उत्पन्न मिळविण्याकरीता शेतमजूर म्हणून काम करतात.

***संदर्भ*** *:–*

1. *अतकरे, प्रकाश.2002. भारताचा आर्थिक विकास,*

2. *नाशिक कुलसचिव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पृ शर्मा एंव सिंह, भारत का आर्थिक विकास आगराः साहित्यावन*

3. *वर्तमानपत्रे*